(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे आदिवासी कवितेत उमटलेले प्रतिबिंब"

**डॉ. भीमराव खं. वानोळे** सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत bkwanole@gmail.com

---

महाराष्ट्र राज्यात ४५ आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. या आदिवासी जमातीचे प्रतिनिधित्व करणारे आदिवासी साहित्य हे मराठी साहित्य वर्तुळात प्रामुख्याने १९९० नंतर आपल्या स्वतंत्र वेगळेपणाने दाखल झाले. कविता, कथा, कादंबरी, आत्मकथने इत्यादी प्रवाह प्रामुख्याने आदिवासी साहित्यक्षेत्रात निर्माण होत आहेत. आदिवासी संस्कृती, निसर्ग, त्यांचा जाज्वल्य इतिहास, थोर क्रांतीकारक, समाजसुधारक अशा अनेक गोष्टी आदिवासी साहित्याच्या केंद्रस्थानी असलेल्या दिसतात. बिरसा मुंडा, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचारांची स्फुर्तीप्रेरणा आदिवासी साहित्यामध्ये प्रामुख्याने प्रतिबिंबित झालेली दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. त्यांनी दलित, आदिवासी, आणि समाजातील अन्य वंचित घटकांच्या उद्धारासाठी आयुष्यभर संघर्ष केला. विशेषतः सामाजिक न्याय, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, आणि समानतेचे विचार मांडून त्यांनी वंचित समाजाला नवजीवन दिले. आदिवासी समाज आजही शोषित आणि वंचित राहिलेला आहे. त्यांच्या उत्थानासाठी डॉ. आंबेडकरांचे विचार प्रेरणादायी आहेत. आज शिक्षणाने सजग झालेल्या आदिवासी लेखक, कवी, विचारवंतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व त्यांनी आदिवासींसाठी संविधानामध्ये करून ठेवलेल्या तरतुदी यांचे महत्व लक्षात येत आहे. आज आदिवासींच्या चळवळी व समाजजीवनात दिसत आहे. आदिवासी साहित्यिकांच्या साहित्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्व अधोरेखित होत आहे. आदिवासी कवितेचा प्रवाह समर्थपणे पैलणारे कवी नव्याने कविता लेखन करीत आहेत. त्यामध्ये विनायक तुमराम, वाहरू सोनवणे, उषाकिरण अत्राम, कुसुम अलाम, भुजंग मेश्राम, प्रभू राजगडकर, दशरथ मडावी, बाबाराव मडावी, वामन शेडमाके, वसंत कनाके, संजय लोहकरे, कृष्णकुमार चांदेकर, सखाराम डाखोरे, शंकर बळी, सुरेश धनवे, शीतल ढगे इत्यादी अनेक नवोदित आपल्या कवितेतून आदिवासी जीवनजाणिवा अभिव्यक्त करीत आहेत.

**उद्दिष्ट्ये**

१.आदिवासी साहित्यातील कवितेचे स्वरूप स्पष्ट करणे.

२.आदिवासी कवितेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रतिबिंब अधोरेखित करणे.

**गृहीतके**

१.आदिवासी साहित्यातील कवितेचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

२.आदिवासी कवितेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रतिबिंब अधोरेखित करता येईल.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे आदिवासी कवितेत उमटलेले प्रतिबिंब" या शीर्षकाच्या शोधनिबंधाची मांडणी करताना प्रामुख्याने वर्णनात्मक व आशयविश्लेषण संशोधन पद्धतीचे उपयोजन केलेले आहे. व त्यानुषंगाने शोधनिबंधाचे निष्कर्ष अधोरेखित केलेले आहेत.

**डॉ. आंबेडकरांचे विचार आणि आदिवासी कविता**

आदिवासी कविता ही प्रस्थापित समाजव्यवस्थेपेक्षा कोसोदूर असलेल्या, डोंगराळ भागात वस्ती करून राहणाऱ्या, या देशातील मूळचे असलेल्या, प्राचीन संस्कृती आणि निसर्गाचे जतन संवर्धन करणाऱ्या आदिवासी समूहाचे प्रतिनिधित्व करते. "आदिवासी आणि काव्य यांचा संबंध फार जवळचा आहे. आदिवासी सर्वात प्रथम बोलला तो काव्यातूनच. जीवनात येणाऱ्या विविध प्रसंगांना धैर्याने तोंड देतानाच त्यांच्या तोंडून काव्यही तेवढ्याच सहजतेने बाहेर पडले आहे."१ आदिवासींची कविता ही जीवनानुभव, संस्कृती, इतिहास, अन्याय अत्याचार, विषमता, वेदना व विद्रोह इत्यादी विविधांगी अनुभव अभिव्यक्त करते. प्राचीन काळापासून येथील सामान्य माणसावर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार झालेले आहेत. त्यामुळे प्रत्येक अन्यायग्रस्त व्यक्तीने त्याचा प्रतिकार केला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी अनेक तरतुदी करून ठेवलेल्या आहेत. त्याचा प्रभाव वर्तमान समाजजीवनावर पडत आहे. आदिवासी कवी माधव सरकुंडे यांच्या 'मी तोडले तुरुंगाचे दार' काव्यसंग्रहाविषयी लिहिताना डॉ. अशोक कांबळे म्हणतात, "इथल्या प्रस्थापित व्यवस्थेच्या छाताडावर बसल्याशिवाय आपल्याला न्याय मिळणार नाही. त्याविरुद्ध बंड केले पाहिजे. स्वप्न कसे कोरायचे याचे भान देणारा फिनिक्स पक्षी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! आंबेडकरी विचारांनीच हे भान सकल दलितांनाच नाही तर आदिवासींनाही मिळाले हे सर्वश्रुत आहे."२ आदिवासी साहित्य प्रवाह हा स्वतंत्र आपल्या वेगळेपणाने निर्माण होत असला तरी 'शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा' असा मूलमंत्र देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व विचार आदिवासी समाजाला हत्तीचे बळ देणारे असल्याचे आदिवासी कवितेतून प्रामुख्याने दिसून येते. शिक्षण हा समाजाच्या उद्धाराचा प्रमुख मार्ग असल्याचे डॉ. आंबेडकरांचे

विचार आदिवासी कवितांमध्ये प्रतिबिंबित झालेले आहेत. आदिवासींच्या शैक्षणिक मागासलेपणाविषयी चिंता आणि शिक्षणातून समाजाच्या उन्नतीसाठी आवाहन कवी करतात. एकंदरीत डॉ. आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, शिक्षण याविषयी स्पष्ट केलेले विचार आदिवासी कवितेत कसे प्रतिबिंबित झाले आहेत. विद्रोह हा समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा, रूढी व प्रस्थापित अन्यायकारी व्यवस्था यांना दिलेला नकार असतो. अन्याय, अत्याचार, शोषण इत्यादींच्या विरुद्ध आपल्या अस्मितेसाठी अस्तित्वासाठी आदिवासींनी केलेला संघर्षही आदिवासी कवितांचा एक मुख्य गाभा आहे. "आदिवासी कवितांमधील विद्रोह आदिवासी माणूस आहे. त्यांच्या मुक्तीसाठी पुकारलेला हा विद्रोह दिसून येतो. आदिवासी जात नसून तो एक वर्ण आहे."३ शिक्षणाने साक्षर झालेला आदिवासी समूह चळवळ, राजकारण व साहित्य क्षेत्रात आपले विचार मांडण्यास सज्ज झालेला आहे. त्यामुळे त्यांच्या विचाराचा सार हा आंबेडकरी विचारप्रवाहाकडे जाणारा आहे. त्यानुषंगाने आदिवासी कवींनी आपल्या विचारांची आणि भावनांची अभिव्यक्ती आंबेडकरवादी तत्वांशी जोडलेली आहे.

डॉ. आंबेडकरांनी नेहमीच सामाजिक न्यायाची मागणी करून संविधानामध्ये तरतुदी करून ठेवलेल्या आहेत. पण आज २१ व्या शतकातही सामान्य व्यक्ती, स्त्रिया, आदिवासी, दलित इत्यादी घटकांवर होणारे अन्याय अत्याचार पूर्णार्थाने थांबलेले नाहीत. त्याविरुध्द संघर्ष करणे अत्यंत गरजेचे असल्याने आदिवासी कवींनी आपल्या काव्यातून आवाज उठवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने अनेक पंगु, मुक्यांना जगण्याचे बळ दिलेले आहे. याविषयीची विवेचन करताना आदिवासी कवयित्री उषाकिरण आत्राम म्हणते,

"तुझ्यापुढे सदैव झुकवीन
मी माझा माथा
सूर्यनगरीच्या हे भिमराया
गाईन तव गाथा
अंधारातील धुलिकणांचे
सुवर्ण तू केले
मुक्या आंधळ्या पंगूंनाही
जीवन तूच दिले"४

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समता, स्वातंत्रता, बंधुता आणि एकूणच विचारसरणी ही मानवी मूल्यांना महत्त्व देणारी असल्यामुळे कवयित्रीच्या मनात आदराची भावना आहे. प्राचीन काळापासून पशुसमान गुलामगिरीत जीवन व्यतीत केलेल्या अनेक मानवी समूहाला माणूस म्हणून जगण्याचा अत्यंत महत्वाचा अधिकार भारतीय संविधानाने दिलेला आहे. त्यामुळे असंख्य दुबळ्यांना नवसंजीवनी मिळाली.

आदिवासी कवयित्री शितल ढगे आपल्या 'रानफुल' या काव्यसंग्रहात म्हणते,

"मनुस्मृति जाळली | क्रांतीची मशाल
प्रकाशित मन | प्रज्ञा सूर्य
युगप्रवर्तक | स्त्री उद्धारक
घडविले आम्हा | मुक्तिदाता"५

अन्यायग्रस्त सामान्य माणसांच्या मनात क्रांतीची मशाल पेटविणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रत्येक माणसाचे स्फूर्तीस्त्रोत आहेत. स्त्रिया, माणसा माणसात दुजाभाव निर्माण करणाऱ्या मनुस्मृतीचे प्रतिकात्मक दहन करून अवघ्या स्त्रियांना स्व अस्तित्वाची जाणीव करून दिली. त्यामुळे आज स्त्री समाजात ताठ मानेने जीवन जगात आहे. स्त्रियांचा मुक्तिदाता म्हणून कवयित्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदराने उल्लेख करते.

'आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा' या काव्यसंग्रहात आदिवासी कवी संजय लोहकरे म्हणतात,

"बिरसा आणि बाबासाहेब
आतूनच जागवतोय आमचा आत्मभान
आम्ही शोध घेतला इतकी वर्ष गुलामीचा
तुमच्या लाचार आणि मुर्दाड राजकारणावर
थुंकण्याचे धाडस आम्ही करणार आहोत उद्या
तुम्ही तेवढे जपून राहा अन्यथा…
भर चौकात ढुंगणावर लाथा खाव्या लागतील
इतकी वर्ष गुलामी ठेवलेल्या गुलामांच्या"६

आदिवासी समाजचे आत्मभान जागे झाले आहे याची जाणीव आदिवासींच्या चळवळीतून दिसते. तसेच आदिवासी साहित्यिक आपल्या साहित्यात अधोरेखित करतात. बिरसा मुंडा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आदिवासींच्या मनात शिक्षणामुळे खोलवर रुजत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्ष लादलेली गुलामी, मुर्दाड राजकारण, लाचार व्यवस्था इत्यादींविषयी आदिवासी सजग होत आहे. त्यामुळे आज आदिवासी संविधानिक मार्गाने प्रश्न विचारायला तयार झालेला आहे, तो अन्यायाविरुद्ध पेटून उठला आहे.

आदिवासी कवी प्रा. माधव सरकुंडे 'तुम्हीच ठरवा' या कवितेमध्ये म्हणतात,

"राज्यघटनेच्या युगातही
तुम्हाला गुलाम समजतो
तो गावगाडा मला मान्य नाही
तुमचं माना झुकवत जगणं
मी जगणं मानत नाही
सांगा गड्यांनो !
का पुन्हा पुन्हा विझतो
तुमच्याच चुलीतला जाळ?
का तुमचेच होते शोषण
सकाळ संध्याकाळ ?"७

डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून माणसामाणसातील भेदाभेद नष्ट केलेला आहे. समाजात समानता प्रस्थापित होण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहेत. पण आजही आदिवासी समाज अन्याय अत्याचाराने भयभीत आहे. त्यामुळे कवीच्या कवितेत विद्रोहाची भाषा जन्माला आलेली दिसते. गुलामी, शोषण, अन्याय अत्याचार आजही होतो याचा कवी निषेध करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी कवीच्या मनात आदराची भावना आहे. भारतीय लोकशाहीला दिलेल्या संविधानात्मक आंबेडकरवादी मूल्यांचा ठेवा फार मोठा आहे. याविविषयी कवी म्हणतो,

"मी उगवलोय खडकाळ सूर्या सोबत
आता माझ्या क्षितिजावरून
कायम हटलीय संध्याकाळ
अन उरली फक्त निळी पहाट"८

भारतीय स्वातंत्र्याची पहाट आणि आंबेडकरांचे विचार यांची समानार्थक याबाबत कवींनी प्रतिकात्मकता साधलेली आहे. निळा रंग हा समाजवादाचे आणि त्यांच्या एकूण समताधिष्ठित स्वातंत्र्य, बंधुत्ववादी भूमिकेचे समर्थन करणारा आहे. आदिवासी समाजाने आपल्यावरील अन्याय अत्याचाराला झिडकारून वेगळी समताधिष्ठित स्वातंत्र्य, बंधुत्ववादी वाट शोधावी असा विचार कवी व्यक्त करतो.

आदिवासी हा एक माणूस आहे. त्याला माणसाप्रमाणे जगता येत नाही. तो खर तर येथील मूळवासी असूनही जल, जंगल, जमीन यापासून तो बेदखल होत आहे. एवढेच नाही तर त्यांच्यावर वर्षानुवर्ष अन्याय अत्याचार होत आहे. प्रस्थापित समाजव्यवस्था त्याच्या भोळेपणाचा व अज्ञानाचा फायदा घेऊन त्याला लुबाडत आहे. आजही आदिवासींच्या शिक्षण, आरोग्य ह्या मूलभूत गरजाही पूर्ण झालेल्या नाहीत. स्वातंत्र्यानंतर लोकशाहीमुळे शिक्षणाचा झालेला प्रसार आदिवासींना काही अंशी सजग होण्यास पोषक ठरलेला आहे. त्यामुळे आदिवासी कवितेत आदिवासी कवी आपल्या जीवनजाणिवा अभिव्यक्त करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण, समानता, स्त्री विषयक दृष्टीकोन, अन्याय अत्याचार विरुध्द संघर्ष विचार अशा अनेक विचारांचे प्रतिबिंब आदिवासी कवितेत येते.

**निष्कर्ष:**

१.आदिवासी कविता ही मराठी भाषेसह आदिवासी जमातीच्या बोली भाषेत निर्माण झालेली आहे.

२.आदिवासींच्या साहित्यात कविता हा साहित्यप्रकार प्रारंभी आलेला आहे. तसेच मौखिक काव्याचे महत्व अनन्यसाधारण आहे.

३.आदिवासी कवितेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, शिक्षण, स्त्री विषयक दृष्टीकोन इत्यादी विचारांचे प्रतिबिंब प्रामुख्याने अधोरेखित होते.

४.आदिवासी कविता विविधांगी भाषिक वैशिट्यांसह विद्रोहाची भावना प्रामुख्याने अभिव्यक्त करते.

५.आदिवासी कवी व कवयित्री आपापल्या सुख-दु:खात्मक जीवन जाणिवा कवितेच्या माध्यमातून व्यक्त करीत आहेत.

**संदर्भ:**

१. विनायक, आदिवासी साहित्य : दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशना औरंगाबाद, पृष्ठ क्र. २५.

२. सरकुंडे माधव, मी तोडले तुरुंगाचे दार, देवयानी प्रकाशन यवतमाळ, प्रथम आवृत्ती २०२१, पृष्ठ क्र.७९.

३. फुलावे सुभाष, शतकातील आदिवासी कविता आकलन आणि मूल्यमापन, चेन्नई प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती२०१४, पृष्ठ क्रमांक ७१

४ . आत्राम उषाकिरण, म्होरकी, गोंडवन गोंडी साहित्य परिषद, नागपूर १९९७.

५ . ढगे शितल, रानफुल, समीक्षा पब्लिकेशन श्रीरामपूर यवतमाळ, प्र. आ. २०२१, पृष्ठ क्र.१८.

६. लोहकरे संजय, आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा, मेधा पब्लिकेशन हाऊस, अमरावती प्रथम आवृत्ती २०१७ प्रश्न क्रमांक ५८.

७ . तत्रैव, सरकुंडे माधव, पृष्ठ क्र.३७-३८.

८. तत्रैव, सरकुंडे माधव, पृष्ठ क्र. ३५.